कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२१–२२/१५४१
दि.०६/१०/२०२१

**कृपया प्रसिध्दीसाठी**

कला अकादमी आयोजित मराठी 'अ' गट नाट्य स्पर्धा डिसेंबर २०२१ च्या पहिल्या आठवडयापासून रविंद्र भवन, साखळी येथे आयोजित करण्यात येणार आहे. सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नियमावलीची पुस्तिका प्रवेशिकेसह कला अकादमीच्या कार्यक्रम व विकास विभाग, आदिलशाह पॅलेस, जुने सचिवालय, पाटो, पणजी–गोवा येथे ११ ऑक्टोबर २०२१ पासून विनामूल्य उपलब्ध असणार आहेत. विहीत नमुन्यातील प्रवेशिका स्विकारण्यासाठीची अंतिम मुदत २० ऑक्टोबर २०२१ सायं. ४.०० वाजेपर्यंत राहील. अंतिम मुदतीनंतर कुठल्याही परिस्थितीत प्रवेशिका स्वीकारण्यात येणार नाही यांची सर्व संबंधित संस्थानी नोंद घ्यावी.

विहीत नमुन्यातील प्रवेशिका सादर करतेवेळी संस्थेचे नाव, रजिस्ट्रेशन क्रमांक, नोंदणी करण्याचा दिवस, संस्था नोंदणी कायद्याच्या सुधारीत नियमानुसार सर्व नोंदणीकृत संस्थानी आपल्या संस्थांचे नोंदणीकरण करणे बंधनकारक असल्याकारणाने सदरचा तपशील (नोंदणीकरण अथवा नूतनीकरणाची साक्षांकीत सत्यप्रत) नाटकाचे नाव, एवढीच माहिती पुरविणे आवश्यक आहे. स्पर्धक संस्थेला आपल्या प्रवेशिकेसोबत रू. ५००/– (रूपये पाचशे मात्र) प्रवेशशुल्क तसेच अनामत रक्कम रू. ५०००/– (रूपये पाच हजार मात्र) रोख स्वरुपात कला अकादमीकडे भरणा करावी लागेल. कलाकारांच्या व तंत्रज्ञांच्या नामावलीच्या चार प्रती व संहितेच्या चार प्रती स्पर्धक संस्थेला प्रयोगाच्या दिवशी तर नविन सहिंता व खास स्पर्धेसाठी लिहीलेली सहिंता असल्यास नाटयप्रयोगाच्या तीन दिवस अगोदर कला अकादमीकडे द्यावी लागेल. सदर स्पर्धेचा अनुक्रम सहभागी संस्थांच्या प्रतिनिधीसमक्ष दि. २० ऑक्टोबर २०२१ रोजी सायं. ४.३० वाजता उपरोल्लेखित पत्यावर ठरविण्यात येणार आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

**महितीसाठी प्रतः–**

लेखाधिकारी, कला अकादमी गोवाः–कृपया संस्थाचे प्रवेशशुल्क व अनामत रक्कम रोख स्वरुपात स्वीकारण्याची व्यवस्था करावी.